MHOS100002302017

## नियमित दिवाणी दावा क्र. १४८/२०१७
### निशाणी क्र.४४ खाली आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ३ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश २६ नियम ९ अन्वये न्यायालयीन आयुक्त यांची नियुक्ती होण्याकरीता दाखल केला आहे.

०२. प्रतिवादी क्र. ३ यांचे कथन की, प्रस्तुतचा दावा वादींनी प्रतिवादींविरुध्द दावा मालकी घोषीत होऊन अतिक्रमीत क्षेत्राचा ताबा मिळणेकामी व निरंतर मनाई हुकूम मिळणेकामी दाखल केला आहे.

०३. प्रतिवादी क्र. ३ यांचे पुढे कथन की, मौजे इंदापुर, ता. वाशी येथील जमीन भु.क्र. ७९/ब एकुण क्षेत्र ०७ हे. २३ आर, पो.ख. ०८ आर पैकी क्षेत्र ०१ हे. ८५ आर ज्याची चतुःसिमा पुर्वेस–स.नं. ९६/ब मधील वादी क्र. २ चे क्षेत्र, पश्चिमेस–तेरखेडा रस्ता, दक्षिणेस–कुलकर्णी यांची जमीन व उत्तरेस–वादी क्र. १ यांची स.नं.७९/अ मधील जमीन या मिळकतीचा तो मालक व कब्जे वहिवाटदार आहे. परंतु, वादींनी दाव्यात त्याचे क्षेत्र चुकीच्या पध्दतीने दोन तुकड्यांत दर्शविले आहे. वादीने प्रस्तुत दाव्यात दिलेल्या अर्जानुसार दावा मिळकतीची मोजणी होऊन अहवाल व नकाशा दाखल करण्यात आला

आहे. सदर मोजणी न्यायालयीन आयुक्त यांनी न्यायालयाचे आदेशाप्रमाणे केलेली नसुन सदर मोजणीवेळी प्रतिवादींचे क्षेत्र मोजलेले नाही. न्यायालयीन आयुक्त यांनी चुकीची मोजणी करुन चुकीचा अहवाल व नकाशा सादर केला आहे. त्याकरीता वादी व प्रतिवादी यांच्या मिळकतींच्या हद्दीखुणा कायम केल्याशिवाय वादी व प्रतिवादी यांच्यामधील वाद संपुष्टात येणार नाही. त्यामुळे सदर मिळकतींची मोजणी उपअधिक्षक, भुमी अभिलेख, वाशी यांच्यामार्फत होणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांनी मौजे इंदापुर, ता. वाशी येथील जमीन भु.क्र. ७९/ब एकुण क्षेत्र ०७ हे. २३ आर, पो.ख. ०८ आर पैकी क्षेत्र ०१ हे. ८५ आर ज्याची चतुःसिमा पुर्वेस–स.नं. ९६/ब मधील वादी क्र. २ चे क्षेत्र, पश्चिमेस–तेरखेडा रस्ता, दक्षिणेस–कुलकर्णी यांची जमीन व उत्तरेस–वादी क्र. १ यांची स.नं.७९/अ मधील जमीन या मिळकतीची मोजणी उपअधिक्षक, भुमी अभिलेख, वाशी यांच्यामार्फत होण्याची विनंती केली.

**०४.** प्रस्तुत अर्जास वादींनी नि.क्र. ४७ वर त्यांचे म्हणने दिलेले आहे. वादींचे कथन की, प्रतिवादी क्र. ३ चा प्रस्तुतचा अर्ज चुकीचा व खोटा आहे. न्यायालयीन आयुक्त यांनी दावा मिळकतीची मोजणी करुन योग्य अहवाल व नकाशा न्यायालयात सादर केलेला आहे. त्यांमुळे त्यांनी प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

**०५.** वादीनेनी प्रस्तुतचा दावा हा मालकी घोषीत होऊन अतिक्रमीत क्षेत्राचा ताबा मिळणेसाठी व निरंतर मनाई हुकूम मिळणेकामी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. ३ यांचे

कथन आहे की, प्रस्तुत प्रकरणात केवळ दावा मिळकतीची मोजणी पुरेशी नसुन वादी व प्रतिवादी क्र. ३ यांचे मिळकतींची मोजणी होऊन त्यांच्या मिळकतीच्या हद्दी खुणा कायम करणे आवश्यक आहे. त्यामुळे केवळ तोंडी पुरावा देवुन दावामिळकतीमध्ये प्रतिवादींनी अतिक्रमण केले आहे किंवा कसे हे शाबीत करता येत नाही. म्हणुन माझ्या मते प्रतिवादी क्र. ३ यांचे मिळकतीची मोजणी करुन हद्दीखुणा तज्ञ मोजणीदारामार्फत निश्चित न केल्यास अतिक्रमण आहे किंवा नाही हे शाबीत होणार नाही. परिणामी, वादी व प्रतिवादींमध्ये मिळकतीच्या हद्दीवरुन असलेला वाद संपुष्टात येणार नाही. म्हणुन प्रतिवादी क्र. ३ चे मिळकतीची उपअधिक्षक, भुमी अभिलेख, वाशी यांच्यामार्फत मोजणी होणे आवश्यक आहे. सदर मोजणीमुळे वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, वादी व प्रतिवादी यांच्या मिळकतीची प्रत्यक्ष स्थिती हद्दीखुणा, अतिक्रमण या बाबतची खरी वस्तुस्थिती न्यायालयासमोर येणार आहे. त्यामुळे दाव्याचा गुणदोषावर निर्णय करणे सोईचे होणार आहे. प्रतिवादी क्र. ३ यांचे मिळकतींची मोजणी करुन या प्रकरणात वस्तुस्थितीदर्शक अहवाल मागविणे हे अंतीम न्यायाच्या दृष्टीने योग्य ठरणार आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो–

## आदेश

१) अर्ज निशाणी क्रमांक ४४ मंजुर करण्यात येत आहे.

२) उपअधिक्षक, भुमि अभिलेख, वाशी यांची या प्रकरणात न्यायालयीन आयुक्त

म्हणुन नियुक्ती करण्यात येते.

३) न्यायालयीन आयुक्त यांनी मौजे इंदापुर, ता. वाशी येथील भु.क्र. ७९/ब मधील क्षेत्राची पोटहिस्स्यासह मोजणी करुन त्याच्या हददीखुणा निश्चित कराव्यात तसेच प्रतिवादी क्र. ३ यांच्या मिळकती कोणत्या ठिकाणी स्थित आहेत हे दर्शवून त्याबाबत वस्तुस्थितीदर्शक सविस्तर अहवाल नकाशासह न्यायालयामध्ये आदेश तारखेपासुन दोन महिन्यात सादर करावा.

४) न्यायालयीन आयुक्त यांनी वादी, प्रतिवादी व दावामिळकतीच्या लगतच्या मिळकतधारकांना पाहणी व मोजणी पुर्वी लेखी पुर्व सुचना द्यावी.

५) प्रतिवादी क्र. ३ यांनी न्यायालयीन आयुक्त कामाचे शुल्क परस्पर उपअधिक्षक, भुमि अभिलेख कार्यालय, वाशी यांचेकडे भरणा करावे.

६) आदेशीका शुल्क भरल्यानंतर कमीशन रिट पाठवावे.

MAHADEVI VISHAL PATIL
Digitally signed by MAHADEVI VISHAL PATIL
Date: 2026.07.03 14:53:32 +0530

वाशी. (श्रीमती एम.व्ही. पाटील–राठोडे)

दिनांक – ०३/०७/२०२६. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, वाशी.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Shri. A.M. Wagh, Stenographer (Grade-III) |
| Court | --- | Civil Court, Jr. Division, Washi, Tq.Washi, Dist.Dharashiv |
| Date | --- | 03/07/2025 |
| Order signed by the presiding officer on | --- | 03/07/2025 |
| Order uploaded on | --- | 03/07/2025 |